


छत्रपती राजर्षी शाहू महाराज
यांच्या पुण्यतिथीनिमित्त
विनम्र अभिवादन!

6 MAY


# खबर
## से हकिकत तक्

KHABAR SE HAKIKAT TAK

मुख्य संपादक
**शिरीषकुमार तुकाराम शेरखाने**
मो.९०४९८४४४१२

कार्यकारी संपादक
**ॲड.चंद्रशेखर धोत्रे**, मुंबई

RNI No. : MAHMAR/2023/86200
website:https://khabarsehakikattak.in
Email : shirishkumarsherkhane@gmail.com



10 MAY

महात्मा बसवेश्वर
यांच्या जयंतीनिमित्त
कोटी-कोटी प्रणाम!

लातूर | मराठी | साप्ताहिक | वर्ष : १ ले. | अंक : ४८ वा. | सोमवार दि. ०६ ते १२ मे २०२४ | पाने : ४ | किंमत : २ रू.

# ७ मे रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासनाची तयारी पूर्ण-जिल्हाधिकारी

## पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी मतदान केंद्रांवर होणार बियांचे वाटप / प्रत्येक मतदारसंघात एक इकोफ्रेंडली, सखी, दिव्यांग आणि युवा संचलित मतदान केंद्र

लातूर : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर मतदारसंघात ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ दरम्यान २ हजार १२५ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. ५ मे रोजी सायंकाळी ६ पासून जाहीर प्रचार बंद झाला आहे.

या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यासाठी विविध पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. मतदारांवर कोणत्याही आमिष, प्रलोभन दिले जात असल्यास किंवा कोणताही दबाव आणला जात असेल किंवा धमकावले जात असल्याचे निदर्शनास असल्यास अशा व्यक्तींवर कठोर कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेला पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी




(पान २ वर)

### मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात-पोलीस अधीक्षक

लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदान ७ मे रोजी होणार असून प्रचाराचा कालावधी संपला आहे. मतदान प्रक्रिया शांततेत आणि कोणताही अनुचित प्रकार न घडता पार पडावी, यासाठी आवश्यक ३ हजार ७६८ अंमलदार, २४२ अधिकारी आणि १ हजार ८०० होमगार्ड यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये अकोला, सोलापूर, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तसेच बीएसएफची एक तुकडी आणि आंध्र प्रदेशातील राज्य राखीव पोलीस दलाच्या चार तुकड्याही जिल्ह्यात आलेल्या आहेत. समाज माध्यमातून मतदारांना आमिष दाखविणे, त्यांच्यावर दबाव आणण्यासारखे प्रकार रोखण्यासाठी सायबर सेल काम करीत आहे. असे प्रकार आढळून आल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आदर्श आचारसंहिता कक्षाच्या कार्यवाहीची माहिती दिली. प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांनी निवडणूक सज्जतेबाबत माहिती दिली.

# हि निवडणूक माझे, शृंगारे, मोदींचे भविष्य घडविणारी नाही आपले भविष्य ठरविणारी आहे

## सुधाकर शृंगारे यांना रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करा-नितीन गडकरी

निलंगा : देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीपासून तब्बल साठ वर्षे सत्तेत राहणाऱ्या काँग्रेसने गरिबी हटावचा नारा दिला मात्र यामुळे गरिबीचा हटली नाही उलट गरीब आणखीन गरीब झाला गरिबाला जात नाही गरीबी हटवण्यासाठी सर्व क्षेत्रात रोजगार निर्मिती केली पाहिजे गेल्या दहा वर्षात देशात झपाट्याने विकास होत आहे देश देश जगातील तिसरी महासत्ता होत आहे त्यामुळे ही निवडणूक माझे सुधाकर शृंगारे, नरेंद्र मोदींचे भविष्य घडविणारी नाही तर तुमचे भविष्य ठरवणारी आहे त्यामुळे लातूर लोकसभेचे उमेदवार सुधाकर शृंगारे यांना रेकॉर्ड ब्रेक मताने विजयी करा असे आव्हान केंद्रीय रस्ते विकास




मंत्री नितीन गडकरी यांनी केले. (पान २ वर)

# डॉ.शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न

लोहा : राज्यात महायुती सरकारने आरक्षणाचे राजकारण केले. सरकारमध्ये असूनही सकल मराठा समाज आंदोलकांचा त्यांनी अपमान केला. मराठा, धनगर समाजाला त्यांनी फसवले आहे. काँग्रेसचेने नेते राहुल गांधी यांनी सर्व समाजाला न्याय देण्याची भुमिका घेतली आहे. काँग्रेस ५० टक्के आरक्षणाची मर्यादा काढून टाकणार आहे. देशात जातीय जनगणना करून समाजात वाढलेल जातीय तेढ काँग्रेसच संपवणार आहे, यासाठी इंडीया महाविकास आघाडीचे सरकार देशात निवडूण दयावे असे आवाहन, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि. ४ मे रोजी दुपारी लोहा शहरातील (पान २ वर)




# न्यायालयांनी टेपरेकॉर्डरसारखे काम करु नये-सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली : न्यायालयाने केवळ एखाद्या टेपरेकॉर्डरसारखे काम न करता खटल्यांमध्ये सहभागी होऊन निर्णय द्यायला हवा, अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील न्यायालयांना कानपिचक्या दिल्या. गुन्हेगारी प्रकरणात सरकारी वकीलांकडून विरोधी पक्षातील साक्षीदारांची सक्षमरित्या उलटतपासणी घेतली जात नाही, त्यांना प्रभावी प्रश्न विचारले जात नाहीत, वादविवाद होत नाहीत. याबद्दल सर्वोच्च न्यालयाने खंत व्यक्त केली. अनेक प्रकरणांमध्ये सरकारी वकीलांकडून दिरंगाई किंवा हलगर्जीपणा झाला तरी न्यायालयाला किंवा एखाद्या न्यायाधीशाला योग्य ती कार्यवाही करत निर्णय द्यायला हवा. सत्य बाहेर येण्यासाठी किंवा एखाद्या प्रकरणाच्या मुळाशी पोहोचण्याच्या दृष्टीने न्यायाधीशांनी काम करायला हवे, असे सर्वोच्च न्यायालयात ३ मे रोजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचुड, न्यायमूर्ती जे.बी.पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर झालेल्या एका सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

# लातूर पोलिस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा

## 'पोलिस महासंचालक' या पदकासाठी लातूर जिल्ह्यातील सात पोलिसांची निवड

लातूर : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार पोलिस विभागात विविध प्रवर्गात केलेल्या प्रशंनिय तसेच उल्लेखनिय कामगिरीबद्दल पोलिस अधिकारी, कर्मचार्यांना राष्ट्रपती पदक, शौय पदक तसेच पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्ह तसेच बोधचिन्ह देवून गौरविले जाते. त्याआनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक श्रीमती रश्मि शुक्ला यांनी लातूर जिल्ह्यातील सात पोलीस अधिकारी व अमलदारांची या मानाच्या पदाकसाठी निवड केली आहे.



यामध्ये पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जाधव, माधव केंद्रे, अरुण डोंगरे, बाळासाहेब मस्के, पोलीस अमलदार परमेश्वर अभंगे, शिवाजी गुरव यांचा समावेश आहे. लातूर पोलिस दलातील मानाच्या पदकावर लातूर जिल्ह्यातील सात पोलिस अधिकारी अंमलदारांनी आपले नाव कोरल्याने जिल्हा पोलिस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.पोलीस महासंचालक यांचे सन्मान चिन्ह पटकावलेल्या पोलीस अधिकारी व अमलदार यांचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला व शुभेच्छा दिल्या.

### औराद शहाजनीचे तापमान उच्चांकी ४४.५ अंश सेल्सिअसवर




निलंगा : सूर्य आग ओखत तापमानाने उच्चांकी पातळी गाठली आहे. तालुक्यातील औराद शहाजानी येथील तापमानामध्ये उच्चांकी वाढ होऊन आज दि. ५ मे रोजी तापमान ४४.५ अंश झाल्याने उकाड्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. यामुळे औरादचा तेरणा व मांजरा काट उच्चांकी तापमानात होरफळून जात आहे. वर्षभरातील आज पहिल्यांदाच औराद शहाजानी येथील तापमानात उच्चांकी ४४.५ अंश सेल्सिअस नोंद झाली असल्याचे हवामान मापक मुक्रम नाईकवाडे यांनी सांगितले.

# एनसीआयबीच्या स्टेट डायरेक्टर यांची लातूर येथे सदिच्छा भेट



लातूर : लातूर येथे नुकतेच महाराष्ट्र राज्याचे एनसीआयबीचे स्टेट डायरेक्टर ॲड.चंद्रशेखर धोत्रे, अतिरिक्त स्टेट डायरेक्टर श्वेता भाकरे, सामाजिक कार्यकर्ते श्री भाकरे, एनसीआयबीचे अधिकारी सुरेशकुमार तायडू, सुधीर चेरेकर, ॲड.बसवेश्वर पसारे, रूद्र टाचले, शिरीषकुमार शेरखाने आणि जिल्हा प्रशाला (झोपडपट्टी) मोटेगावच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता खरटमल आदिंच्या उपस्थितीत मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी एनसीआयबीच्या कामाची पाहणी करण्यात आली व सविस्तर अशी यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी एनसीआयबी पदाधिकाऱ्यांचे मान्यवरांकडून कौतुक करण्यात आले.



## संपादकीय....

# मताचे गांभीर्य ओळखा!

इंग्रज आपला देश सोडून जाता-जाता देशाला उभा फाडून इंग्लंडला चालते झाले. मात्र त्या गोऱ्यांनी मायदेशी परतताना देशाची फाळणी करून हा देश कायम अस्वस्थ राहील, याची चोख व्यवस्था केली. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झगडलेली अर्धी अधिक पिढी काळाच्या पडद्याआड गेली. उरलेली थोडीफार दुर्दैवी स्वातंत्र्यसैनिकांची पिढी लोकशाहीची चाललेली परवड पाहून 'डोळे लवकर मिटले तर बरे होईल', असा विचार करीत आज अगतिकपणे दिवस ढकलत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेली पिढीही आता ज्येष्ठ नागरिकत्वाचे फायदे घेत, नव्या पिढीच्या नावाने खडे फोडीत कण्हत-कुथत कालगमन करीत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साधारणतः दहा वर्षे किंवा त्यानंतर जन्मलेल्या आधुनिक पिढीला 'पारतंत्र्य म्हणजे कुठल्या झाडाचा पाला' आणि 'स्वातंत्र्य कशाशी खायचे', याचा नेमका मेळ लागत नाही आणि ते समजून घ्यायला त्यांना वेळही नाही, त्याची त्यांना गरजही वाटत नाही. देश स्वतंत्र झाला, तेव्हा साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते. शिक्षणाच्या सोयी-सुविधाही फारशा नव्हत्या. त्यामुळे 'साक्षरतेचा प्रसार करणे' हा स्वतंत्र भारतापुढचा अग्रक्रमाचा कार्यक्रम होता. पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत शिक्षणासाठी भरघोस तरतुदी करण्यात आल्या. कर्मवीर भाऊराव पाटलांसारख्या शिक्षणमहर्षीच्या प्रामाणिक प्रयत्नांना यश आले आणि आज देशातील चारदोन राज्ये सोडली तर साक्षरतेचे प्रमाण समाधानकारकरीत्या वाढले आहे. 'औद्योगिक क्रांती', 'हरित क्रांती' फलस्वरूप होऊन, पारतंत्र्यात उपासमार सोसणाऱ्या भारतीयांच्या पोटाला दोन वेळचे अन्न मिळू लागले. देश अन्नधान्याबाबतीत स्वयंपूर्ण झाला. उद्योगधंदे वाढले, नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध झाल्या. शिकून शहाणी झालेली बुद्धिमान पिढी समाधानाचे चार घास खाऊ लागली. श्रीमंतीची स्वप्ने पाहू लागली. पंचवार्षिक विकास योजनांचे पाणी देशभर फिरले, हरित क्रांतीचे पीक रानारानात तरारले. औद्योगिकवाढीचे चक्र देशभर फिरू लागले आणि आर्थिक प्रगतीची फळे देशभर दिसू लागली. दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या, व्यापार उदिमांची भरभराट झाली. त्यातच संगणक युगाने जोराची मुसंडी मारली. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर देशाने आर्थिक प्रगतीची झेप घेतली. भारत लवकरच 'महासत्ता' होणार असेही बोलले जाऊ लागले. मात्र प्रगतीची ही फळे सर्वांना सारख्या प्रमाणात मिळाली नाहीत. ज्यांना शिक्षणाची संधी मिळाली, ती काही मोजकी मंडळी शिकली, त्यांचीच नोकरी-उद्योगधंद्याद्वारे आर्थिक प्रगती झाली. थोडी मूठभर मंडळी, मध्यमवर्ग, उच्च मध्यमवर्ग, व्यापारी, कारखानदार आणि शेअर मार्केटचा जुगार खेळून श्रीमंत झाली. अचानक श्रीमंत झालेली मंडळी चंगळवादाकडे वळली, पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करू लागली. घरात टीव्ही, फ्रीज, म्युझिक सिस्टीम, दारात मोटार आणि हातात मोबाइल आले. 'आम्ही कर भरतो म्हणजे देशावर आणि देशवासीयांवर महान उपकार करतो', अशी सोयीस्कर समजूत करून ही मंडळी त्यांचे चैनीचे जगणे सोडून इतर बाबींकडे तुच्छतेने पाहू लागली. अशी शिक्षित चंगळवादी मंडळी भरल्यापोटी लोकशाही, राजकारण, भ्रष्टाचार यासारख्या सामाजिक विषयांवर उठल्या-बसल्या तोंड फाटेपर्यंत चर्चा करण्यात कर्तव्यपूर्तीचा आनंद घेऊ लागली. कारखान्यात, कार्यालयात, रेल्वेत, मोटारीत, रस्त्यात, गुत्त्यात, पार्टीत, क्लबमध्ये 'भ्रष्टाचार किती बोकाळलाय', 'राजकारणी कसे हरामखोर आहेत!', 'लोकशाहीची कशी वाट लागलीय!' या विषयांवर 'प्याले' रिचवीत, पोटतिडकीने पोपटपंची करू लागली. 'आपण लोकशाहीला लायकच नाही आहोत' अशी अगदी टोकाची भूमिका मांडत, स्वातंत्र्य देताना ब्रिटिश संसदेत चर्चील काय म्हणाला होता, हे उदाहरणासहित सांगितले जाऊ लागले... या मंडळींबाबत लक्षात घेण्याजोगी बाब अशी की, ही सर्व चर्चा करताना आपण स्वतः सोडून इतरांबद्दलच ते बोलत राहतात. ज्या देशामुळे, ज्या लोकशाहीमुळे आपण इथपर्यंत पोहोचलो, इतकी सुबत्ता आली, त्या देशाप्रती लोकशाहीसाठी आपली काही कर्तव्ये आहेत किंवा नाहीत, याचा मात्र विचार करण्याची या 'चर्चीलां'ना गरज भासत नाही. लोकशाही, राजकारण, सामाजिक बांधिलकी अशा विषयांवर सवंग चर्चा करणारे हे सर्व बुद्धिवादी 'चर्चील' नेमक्या निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी मतदान करायचे सोडून पिकनिक स्पॉटवर जाऊन पिता-पिता पुन्हा चर्चेचा आनंद घेण्यात सार्थक समजतात. देशाचा एक सुबुद्ध नागरिक म्हणून आपण मतदान न करून राष्ट्रीय कर्तव्यात कसूर केली, याची जराशुद्धा खंत या तथाकथित बुद्धिवादी बडबडणाऱ्यांना वाटत नाही, हे या देशाचे खरे दुर्दैव आहे. हे असे का होते? ग्रामीण भागात कष्ट करणारी, डोंगरदऱ्यात दुर्गम भागात राबणारी गोरगरीब जनता कामधंदा सोडून, प्रसंगी प्रवासखर्चासाठी पदरमोड करून मतदानाचे 'पवित्र कर्तव्य' पार पाडते आणि खेड्यापाड्यात अगदी दुर्गम भागातही सत्तर-ऐंशी टक्के मतदान होते. मात्र लोकशाहीची शेलकी फळे चाखलेली आणि लोडशेडिंगची झळ न पोहोचलेली शहरातली सुखासीन शहाणी, शहाजोग मंडळी, 'कसले मतदान करायचे' म्हणत मतदान केंद्राकडे तुच्छतेने पाठ फिरवतात. त्यामुळे मोठ्या शहरात जेमतेम पस्तीस-पंचेचाळीस टक्केच मतदान होते.

त्यामुळे 'लायक' माणसे निवडून येत नाहीत. प्राणांची आहुती देऊन मिळवलेल्या या स्वातंत्र्याचे असे 'मातेरे' होतेय, याच्यावर काही इलाज करता येणार नाही काय? देशातील सर्व नागरिकांना मतदान सक्तीचे करता येणार नाही का? कुठलेही अपरिहार्य आणि समर्थनीय कारण नसताना मतदानाच्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या दीड शहाण्यांवर दंडात्मक कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद करता येणार नाही का? मतदार यादीत नाव असलेल्या नागरिकाने मतदान न केल्यास दुसऱ्याच दिवशी कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागले तर हे सर्व तथाकथित शिक्षित, शहाणे, 'चर्चील' निमूटपणे मतदान केंद्राची वाट चालू लागतील आणि लोकशाहीचा गाडाही वेगाने धावू लागेल. मतपत्रिकेत नमूद असलेल्या उमेदवारांपैकी एकही उमेदवार 'लायक' वाटत नसल्यास 'वरीलपैकी एकही उमेदवार योग्य नाही', अशा अंतिम शेवटच्या पर्यायाला मतदान करण्याचे स्वातंत्र्यही आहेच की. म्हणजे राजकारण्यांच्या नावाने 'चुना' घालत मतदान केंद्राकडे पाठ फिरविणे हा दखलपात्र गुन्हा ठरवावा, तरच ही चंगळवादी, शहाजोग मंडळी सरळ होतील आणि न चुकता मतदानाला जातील. देश आता पंच्याहत्तरीचा झालाय, ज्येष्ठांच्या पंगतीत बसलाय आणि म्हणूनच घटनाकर्त्यांची लोकशाहीची धारणा पूर्ण करण्यासाठी देशातील ज्येष्ठ विचारवंतांनी, कायदेपंडितांनी, समाजधुरिणांनी आणि प्रामाणिक पुढाऱ्यांनीही 'मतदान सक्तीचे' करण्यासंबंधी आवश्यक ती कायदेशीर तरतूद करण्यासाठी त्वरित पावले उचलली पाहिजेत; अन्यथा प्रामाणिक, देशाला समर्थ नेतृत्व देऊ शकणारी कर्तबगार, परंतु भ्रष्ट नसलेली सज्जन आणि समर्थ माणसे अडगळीत पडतील. या सगळ्या परिस्थितीत सर्वसाधारण सुजाण नागरिक लोकशाहीचे लचके तोडले जात असल्याचे अगतिकपणे पाहण्यापलीकडे काही करू शकत नाहीत. मनातल्या मनात ते म्हणत असतील, 'आजवरी परक्यांनी लुटले, आज मुळावर घरचे उठले'. स्वातंत्र्यासाठी प्राण गमावलेल्या हुतात्म्यांच्या आत्म्यांनाही मुक्ती मिळणार नाही आणि म्हणूनच सुजाण मतदारांना कळकळीची प्रार्थना, मतदान देगा मतदाता... त्याचा कंटाळा नसावा आता!

# 'माझं लातूर' परिवाराचा योग्य निर्णय

लातूर : गेल्या १२ वर्षांपासून प्रलंबित असलेला जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन दरबारी ७ महिने अविरत पाठपुरावा करणाऱ्या माझं लातूर परिवार या अराजकीय सामाजिक समूहातील काही सदस्यांनी शासनाचा निषेध आणि नाराजी व्यक्त करीत लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता. मात्र परिवारातील अनेक ज्येष्ठ मार्गदर्शक मान्यवरांच्या सूचनेनुसार मतदान बहिष्कार निर्णय मागे घेण्यात येत आहे.

माझं लातूर परिवार हा लोकशाहीवर विश्वास असणारा, समाजातील प्रत्येक घटकातील सुज्ञ, शिक्षित मान्यवरांचा अराजकीय सामाजिक समूह म्हणून राज्यात परिचित आहे. कुठल्याही राजकीय पक्षाला किंवा नेत्याला विरोध किंवा समर्थन करण्यासाठी हा समूह कार्यरत नाही हे वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. विधायक आणि सकारात्मक सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करणे, त्या प्रश्नांकडे प्रशासन आणि शासनाचे लक्ष वेधून घेत अनेक लोकोपयोगी उपक्रम यशस्वीपणे पार पाडले आहेत.

निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाहीचा सर्वोच्च महोत्सव देशभरात साजरा होतो आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे या अधिकाराचा वापर करून माझं लातूर परिवारातील सर्व सन्माननीय सदस्यांनी, हितचिंतकांनी, त्यांच्या कुटुंबीयांनी मतदान करून आपले कर्तव्य पार पाडावे असे जाहीर आवाहन परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. जो पर्यंत जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन होत नाही तोपर्यंत माझं लातूर परिवाराचे आंदोलन सुरू राहील. आता यापुढील माझं लातूर परिवाराची आंदोलने लक्षवेधी आणि निर्णायक राहतील.

# डॉ.शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ जाहीर...

(पान १ वरून) व्यंकटेश मंगल कार्यालयात लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न झाली यावेळी ते बोलत होते.. यावेळी आमदार मोहनअण्णा हंबर्डे, माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, माजी आमदार रोहिदास चव्हाण, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी आमदार हणमंत पाटील बेटमोगरेकर, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या आशाताई श्यामसुंदर शिंदे, शिवा संघटनेचे अध्यक्ष मनोहरराव धोंडे, निरीक्षक अमर जाधव, लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते एकनाथ पवार, प्रा यशपाल भिंगे, पुरुषोत्तम धोंडगे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोईज शेख, शरद पवार, विजय देशमुख, अब्दुल सत्तार, चंद्रसेन पाटील, मौलाना शेख, बालाजी पंडागळे, पुरुषोत्तम धोंडगे, सोनू संगेवार, सुरेश बिलाल, नागेश बिलाल, अब्दुल कुरेशी, साहेबराव काळे, वाहेद अन्सारी, संभाजीराव धुळगुडे, शाम दरक, श्रीनिवास मोरे, पंकज परिहार, मन्मथ चौधरी आदींसह काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे, शेतकरी कामगार पक्षाचे महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**एक शतकाहून अधिक काळ लोहा कंधार सोबत-आमदार अमित विलासराव देशमुख**

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, नांदेड व लातूरच्या सीमेवर लोहा कंधार आहे. एक शतकाहून अधिक काळ लोहा कंधार सोबत देशमुख कुटूंबियांचे नाते आहे. आम्ही माळेगावला सातत्याने आलो आहोत महाराष्ट्राचे आधुनिक भगीरथ म्हणून शंकरराव चव्हाण साहेबांची ओळख आहे, चव्हाण साहेबांनी दाखवलेल्या मार्गावर आपणाला चालायचे आहे, आता लातूर व नांदेड एक आहे असे त्यांनी सांगितले.

महायुती सरकारने आरक्षणाचे राजकारण केले ही निवडणूक महाराष्ट्राच्या अस्मितेची सन्मानाची पुढे बोलताना ते म्हणाले की, भाजपने दोन लोकप्रिय मुख्यमंत्र्यांना जेलमध्ये टाकले, भाजप खासदार लोहा कंधारला एकदाही आले नाहीत, महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे महिन्याला एकदा लोहा कंधार विधानसभेत येऊन जनता दरबार घेतील येणाऱ्या काळात आम्ही सारे जनसेवेसाठी तत्पर राहणार आहोत, काँग्रेस नेते राहुल गांधींनी जनतेला गॅरंटी कार्ड दिले आहे, इंडिया आघाडीचे सरकार आल्यावर काँग्रेस गॅरंटी कार्डची तात्काळ अंमलबजावणी केली जाईल. भाजपने शेतीमालाला भाव दिला नाही, शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नाही, इंडिया आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर शेतीमाला भाव दिला जाईल, शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल, प्रत्येक कुटुंबातील महिलेला एक लाख रुपये बँक खात्यावर जमा केली जातील, युवकांची पहिली नोकरी पक्की करून त्यांना वार्षिक एक लाख रुपये वेतन दिले जाईल. महायुती सरकारने आरक्षणाचे राजकारण केले, सकल मराठा समाज आंदोलकांचा त्यांनी अपमान केला. धनगर समाजाला त्यांनी फसवले, काँग्रेसने नेते राहुल गांधी म्हणाले आहेत ५०% आरक्षणाची मर्यादा आम्ही काढून टाकणार आहोत, देशात जातीय जनगणना केली जाईल, समाजात वाढलेली जातीय तेढ काँग्रेसच संपवणार आहे. महाराष्ट्रात भ्रष्टाचार फोफावला आहे, ही निवडणूक महाराष्ट्राच्या अस्मितेची सन्मानाची आहे, भाजप मतदारांचा अपमान करते काँग्रेस कधीही जनसेवेची साथ सोडणार नाही असे सांगून येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले.

भाजपची नाटकं आता कायमची बंद करा असे आमदार मोहनअण्णा हंबर्डे म्हणाले की, भाजपने दहा वर्षे जनतेला सतवले आहे. या सरकारचा आता जनतेने बदला घ्यावा, भाजपने शेतीमालाला भाव दिला नाही, पेट्रोल डिझेल गॅसची दरवाढ त्यांनी मोठ्या प्रमाणात केली, नागरिकांच्या खात्यात १५ लाख रुपये जमा केले नाही, बेरोजगारांना दोन कोटी रोजगार दिला नाही. महाराष्ट्रात भाजप नेते देवेंद्र फडवणीस यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना व शरद पवार साहेबांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला, भाजप आता कमकुवत झाला आहे. त्यांच्या पायाखालची आता वाळू सरकली आहे, भाजपची नाटकं आता कायमची बंद करा असे सांगून येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. शिवा संघटनेचे अध्यक्ष प्राध्यापक मनोहरराव धोंडे म्हणाले की, भाजप ही लबाडांची पार्टी आहे. महाराष्ट्रातील राजकारणाच वाटोळ करणारा देवेंद्र फडणवीस हा आहे. भाजप खासदार लोहा कंधारला सवतीचे लेकरू समजतात. दहा वर्षांत हे खासदार लोहा कंधारला एकदाही फिरकलेच नाहीत. भारतीय संविधान व लोकशाही आपणाला वाचवायची आहे, कारण येणारा काळ हा हुकूमशाहीचा येऊ शकतो. मराठा व ओबीसी समाजात भाजपने भांडणे लावली, समाजामध्ये त्यांनी तेड निर्माण केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भयानक कटकारस्थान करणारी संघटना आहे, बहुजन समाज शिक्षित होऊ नये अशी त्यांची भूमिका असते सर्व भ्रष्टाचारी लोक भाजपमध्ये घेतली जात आहेत असे सांगून येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, माजी आमदार हनमंत पाटील बेटमोगरेकर, माजी आमदार रोहिदास चव्हाण, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या आशाताई शामसुंदर शिंदे, एकनाथ पवार, प्रा यशपाल भिंगे, पुरुषोत्तम धोंडगे, वाहेद अन्सारी यांनी मनोगत व्यक्त करून लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी मनोगत व्यक्तकरून जनसेवेचे काम करण्यासाठी मला निवडून द्या असे आवाहन केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सतिश देवकते यांनी केले.

# हि निवडणूक माझे, शृंगारे, मोदींचे भविष्य घडविणारी नाही...

(पान १ वरून) दि ३ मे रोजी निलंगा येथील शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात महा विजय भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी बोलत होते यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर, मंत्री संजय बनसोडे ,माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर ,आमदार देवराव होळी ,आमदार अमर राजूरकर, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, माजी आमदार गोविंद केंद्रे, शिवाजी माने, पंडितराव धुमाळ, डॉ नरसिह भिकाने ,माजी जि प उपाध्यक्षा भारतबाई सोळुंके, संजय दोरवे, दगडू सोळुंके, ऋषिकेश कराड, जयश्री ताई पाटील,मंचावर उपस्थित होते, पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले मला लहानपणी रेल्वे स्टेशनवर सायकल रिक्षाने जावे लागायचे चढ लागल्यानंतर सायकल ओढणाऱ्याला खूप त्रास व्हायचा खूप मानवी शोषण व्हायचे मुस्लीम व दलित समाजातील बहुतांश लोक सायकल रिक्षा चालवायचे.

मला ते फार अन्यायकारक वाटायचे. मी २०१४ मध्ये मंत्री झालो तेव्हा १ कोटी लोक रिक्षा चालवायचे, ५० लाख लोक पाठीवर पोते घेऊन जायचे. हे शोषणाचे प्रतिक होते. ई-रिक्षाच्या माध्यमातून त्यांच्या वेदना दूर करण्याचे भाग्य मला लाभले. आज देशात सायकल रिक्षा जवळपास संपुष्टात आल्या आहेत. देशातील दीड कोटी लोकांना मानवी शोषणातून मुक्त केले, हीच माझी कमाई आहे.

भारतीय जनता पक्ष पुन्हा सत्तेवर आला तर घटना बदलेल असा आपप्रचार काँग्रेस वाल्याकडून केला जात आहे. यावर बोलताना केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी म्हणाले ,८० वेळा घटना घटना तोडणारे काँग्रेसवाले भाजपा बद्दल अपप्रचार करीत आहेत. संविधान बदलताच येत नाही, हे वास्तव आहे. सर्वोच्च न्यायालयात केशवानंद भारती केसमध्ये निर्णय दिलेला आहे. संविधानातील मूलभूत रचनेला धक्का लावता येऊ शकत नाही, असे न्यायालयाने आधीच स्पष्ट केले आहे. मात्र, जे कामाच्या भरवशावर निवडून येऊ शकत नाहीत, ते लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी अपप्रचार करीत आहेत, अशी टीका केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली पुढे बोलताना ते म्हणाले शेतकरी आता ऊर्जा दाता झाला पाहिजे शेतकरी केवळ अन्नदाता न राहता तो इंधन दाता झाला पाहिजे तरच त्याच्या जीवनात आर्थिक समृद्धी येणार आहे उसापासून मक्यापासून तांदळापासून धान्याच्या भूषापासून इथेनॉल निर्मिती केली जाणार आहे.

त्यामुळे शेतीला चांगले दिवस येणार असल्याचे सांगून शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग गावातच आले तर गाव समृद्ध होईल युवकांना गावातच रोजगार मिळेल शहराकडे होणारे स्थलांतर थांबणार आहे .ग्रामीण भागातील जल, जमीन, जंगल, यावर आधारित उद्योग उभे झाले पाहिजेत त्यावर आपले सरकार काम करीत असून भविष्यात गावचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम मोदी सरकार करीत असल्याचे सांगून गावातले पाणी गावात घरातले पाणी घरात शेतातले पाणी शेतात आडवावे लागेल आपल्या सरकारने जलसंवर्धन सिंचनाला महत्त्व दिले आहे. शेतीवरील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून आगामी काळात कमी खर्चात आधुनिक तंत्रज्ञान शेतीमध्ये आणले जात आहे. स्मार्ट व्हिलेज ही संकल्पना खेड्यात राबवली जाणार आहे. २४ तास पाणी वीज व गाव सर्व सोयी नियुक्त केले जाणार आहे. त्यामुळे येणाऱ्या सात तारखेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार सुधाकर शृंगारे यांना रेकॉर्ड ब्रेक मताने विजयी करा या मतदारसंघा च्या विकासाची हमी मी घेतो असे आश्वासन शेवटी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.

# अजिंठा लेणी परिसरात पाली भाषा विद्यापीठाची लवकरच निर्मिती होणार-डॉ.उपगुप्त महाथेरो



लातूर : कुठल्याही भाषेला धर्म नसतो. भाषा ही धर्म विरहित असते परंतु आपण भाषेची जोड धर्मासोबत लावलेली आहे. बनारस येथे संस्कृत भाषेचे विद्यापीठ, अलिगड येथे उर्दू भाषेचे विद्यापीठ आणि हिंदी भाषेचे विद्यापीठ वर्धा येथे आहे. मात्र पाली भाषा ही ज्ञान भाषा असून सुद्धा पाली भाषेचे विद्यापीठ कुठेही नाही त्यामुळे पाली भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी अजिंठा लेण्याच्या पायथ्याशी असलेल्या संस्थेच्या ७५ एकर जमिनीवर पाली भाषा विद्यापीठाची लवकरच निर्मिती केली जाईल याला शासनाची मान्यता सुद्धा लवकरच मिळेल असे प्रतिपादन अखिल भारतीय भिक्खू संघ आणि बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरीटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महाराष्र्‌ आणि कामगार दिनानिमित्त त्यांना प्राचार्य कक्षामध्ये श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भंते बुध्दशील, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, केशव कांबळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि डॉ. टि. घनश्याम यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. उपगुप्त महाथेरो म्हणाले की, पाली भाषा ही आराधनेची भाषा नसून ती ज्ञान भाषा आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये ज्ञान आहे.

भाषा ही कुठल्याही धर्माची नसते तर ती मानवी व्यवहाराच्या देवाण-घेवांनीसाठी असते. भाषा ही ज्ञान संपादन करण्यासाठी असते आणि तिची एक वेगळी गरिमा असते. जपान, थायलंड, कोरिया या देशांमध्ये प्रत्येक व्यक्ती ह्या कामामध्ये व्यस्त असतात. विशेषत: महिलांची संख्या या देशांमध्ये अधिक असून त्या उद्योगात कार्य करतात.

देशांमध्ये समृद्ध शेती, संपन्न आरोग्य, मुबलक पाणी उपलब्ध असून भ्रष्टाचाराला थारा नाही त्यामुळे मानवी जीवन सुखी आणि समृद्ध आहे.

देशांमध्ये संघर्ष, भांडणे, परस्पर मतभेद आणि वादविवाद ह्या गोष्टी दिसून येत नाही. प्रत्येकामध्ये विनम्रता आणि समाधान असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती हा प्रसन्न राहतो असे सांगून महाराष्र्‌त आणि कामगार दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमांमध्ये संस्थेचे संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे यांनी डॉ. उपगुप्त महाथेरो यांचे स्वागत करून त्यांना पाली विद्यापीठाच्या निर्मितीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले तर आभार प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मानले.


नांदेड परिक्षेत्रामधील नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली या चारही जिल्हयामधील सर्व नागरिकांना अवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी अथवा कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम, एजेंट यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास किंवा केली असल्यास तात्काळ खालील नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

ACB ला.प्र.वि.

**नांदेड परिक्षेत्र**

**डॉ.राजकुमार शिंदे (भापोसे)**
पोलीस अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड,
मोबाईल क्र. ९६२३९९९९४४

**१.नांदेड**

**श्री राजेंद्र पाटील**
पोलीस उप अधीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, नांदेड युनिट
मोबाईल क्र. ७३५०१९७१९७.

**२.लातूर**

**श्री संतोष बर्गे**
पोलीस उप अधीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, लातूर युनिट
मोबाईल क्र. ७७४४८१२५३५

**३.परभणी**

**श्री अशोक इप्पर**
पोलीस उप अधिक्षक,
अँटी करप्शन ब्युरो,परभणी युनिट
मोबाईल कं.९८५०४८३३३७

**४.हिंगोली**

**श्री अनिल कटके**
पोलीस उप अधिक्षक,
अँटी करप्शन ब्युरो,हिंगोली युनिट
मोबाईल कं.९८७०२२१३७९


# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ललीत कला भवन नांदेड येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा



नांदेड- लेबर कॉलनी नांदेड येथील महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ ललीत कला भवन येथे दि. ०१ मे २०२४ बुधवार रोजी सकाळी ठिक ०७.०५ वाजता महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६४ वा वर्धापन दिन व १०१ वा जागतिक कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम हुतात्मा नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख अतिथी एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांच्या हस्ते पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले व ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली आणि राष्ट्रगीतानंतर लगेचच राज्यगीत म्हणण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून योग विद्याधाम नांदेडचे नारायणराव आष्टुरकर, सौ. कविता आष्टुरकर, मंगला जोंधळे, रमेश केंद्रे, रविचंद्र जगताप, कामगार कल्याण मंडळाचे केंद्र संचालक विलास मेंडके, गुणवंत कामगार तथा सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, लिपीक संदीप कुलकर्णी, शिशु मंदीर शिक्षिका मंदा कोकरे, ग्रंथपाल अर्चना शिवनखेडकर, केंद्र सेवक अरुणा गिरी, नामदेव तायडे, उषा गवई, मल्लीकार्जुन अंबेकर, सोमनाथ दळवी, साईनाथ विभुते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी गुणवंत एच. मिसलवाड यांनी जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिन याविषयी आपले विचार मांडले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, जागतिक कामगार दिन म्हणजे इ.स. १८८६ पासूनचा श्रमजनशाही विरुद्ध कामगार अशा न्याय हक्काच्या बंडाचा लढा होता, तो जागतिक स्तरावर कामगारांनी हाणून पाडला, म्हणून आपण आज जागतिक कामगार दिन मोठ्या उत्साहाने साजरा करतो, असे प्रतिपादन केले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना ही सहजासहजी झाली नसून १०७ मराठी भाषिक कामगार, कष्टकरी, श्रमिकांनी हुतात्मे झाले तेंव्हा १ मे १९६० ला मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. म्हणून १ मे हा दिवस आपण महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करतो, असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन विलास मेंडके यांनी केले तर आभार अर्चना शिवनखेडकर यांनी मांडले. यावेळी कार्यालयीन कर्मचारी वृंद बहुसंख्येने उपस्थित होते.

# देशातील सर्वश्रेष्ठ राज्यघटनेचे सरंक्षण करणाऱ्या नरेंद्र मोदीजींना साथ द्या-माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर



लातूर : १८ व्या लोकसभेची निवडणूक ही देशाच्या दृष्टिने खूप महत्त्वाची आहे. भारत देशाची राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ राज्यघटना आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाचे संविधान निर्माण केले. या राज्यघटनेची प्रतिमा जगामध्ये सर्वश्रेष्ठ आहे. त्यामुळे हे संविधान बदलण्याचा विषय येतच नाही. विनाकारण विरोधक संविधान बदलण्याच्या अफवा पसरवून देशातील सर्वश्रेष्ठ व जागरूक नागरिकांची दिशाभूल करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या या भूलथापांना बळी न पडता देशहितासाठी काम करणार्या व जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटनेचे सरंक्षण करणार्या नरेंद्र मोदीजींना साथ द्या असे आवाहन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते लातूर तालुक्यातील साई येथे आयोजित बैठकीत बोलत होते. यावेळी या बैठकीला भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, आत्माराम पवार,सुधाकर पवार, धैर्यशील पवार, सुरेश पवार, दिलीप पवार, बिटू पवार, गोविंद पवार, राजेभाऊ वलसे, लक्ष्मण मुळे, हनुमंत पवार, हनुमंत टेकाळे, राजेभाऊ पवार, मच्छिंद्र पवार, हरिश्‍चंद्र अडसूळ, नारायण वलसे, माणिक क्षिरसागर, नामदेव क्षिरसागर, मंचक पवार, बाळू पवार, पवन पवार, जगनाथ पवार, लालासाहेब पवार, सिदाजी पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, गेल्या दहा वर्षामध्ये केलेल्या कार्यातून महिलांना न्याय देण्याचे काम केलेले आहे. महिलांसाठी शौचालये, बाळांतपणामध्ये ५ हजाराचे अनुदान, मुलींसाठी सुकन्या योजना अशा एक नव्हे तर अनेक याजनेच्या माध्यमातून महिलांना न्याय देण्याचे काम केलेले आहे. एवढेच नाही तर देशाच्या राजकारणात लोकसभा आणि विधानसभेमध्ये ३३ टक्के आरक्षण देऊन राजकीय क्षेत्रातही महिलांना न्याय देण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे देशाच्या राजकारणामध्ये ३३ टक्के आरक्षणा देणार्या नरेंद्र मोदीजींच्या पाठिशी सक्षमपणे उभे रहा असे आवाहन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

**लातूरचा पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी मोदींना साथ द्या**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षामध्ये विकास कार्यातून भारत देशाचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम केलेले आहे. परंतु लातूरच्या देशमुखांनी साडेआठ वर्षे मुख्यमंत्री व वीस वर्ष मंत्री पदावर राहूनही मात्र लातूरच्या पाणी प्रश्नासाठी काहीही केलेले नाही. वीस वर्षापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याहस्ते उजणीचे पाणी लातूरला आणण्याच्या योजनेचे भूमिपूजन करण्यात आले. परंतु अद्यापपर्यंत थेंबभर पाणीही आणलेले नाही. गेल्या विधानसभा निवडणूकीमध्ये दोन महिण्यात उजनीचे पाणी दोन महिण्यात लातूरला आणू अन्यथा आहे त्या पदाचा राजीनामा देऊ असे आश्वासन देऊनही राजीनामाही दिला नाही आणि लातूरकरांना पाणीही उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे लातूरच्या पाणीप्रश्नावर भाजपा सरकारच तोडगा काढेल त्यामुळे लातूरचा पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींजींचे हाथ बळकट करण्यासाठी खा.सुधाकर श्रृंगारेंना साथ द्या असे आवाहन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

# सार्वजनिक शांततेस बाधा आणणारे झोपडपट्टी दादा, गुंड, हातभट्टीवाले यांचे विरुद्ध लातूर पोलिसांची कडक कारवाईची मोहीम; एम.पी.डी.ए.अंतर्गत जिल्ह्यातील नववी कारवाई

लातूर : वाढत्या गुन्हेगारीला लगाम लावण्यासाठी तसेच लोकसभा निवडणूक-२०२४ व मतदान प्रक्रिया अनुषंगाने पोलीस ठाणे एमआयडीसी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टीदादा (एमपीडीए) कायद्यांतर्गत लातूर शहरातील सुभेदार रामजी नगर परिसरात राहणारा स्वप्निल उर्फ पन्या गौतम कांबळे, वय २४ वर्ष याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाईचा शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणार्या गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी व त्यांची गुन्हेगारी रोखण्यासाठी लातूर पोलिसांकडून कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. स्वप्निल उर्फ पन्या गौतम कांबळे याला 'एमपीडीए' कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबद्ध करुन त्याची रवानगी नाशिक कारागृहात करण्यात




आली आहे. पोलीस अधिक्षक श्री. सोमय मुंडे यांच्या कार्यकाळात जिल्ह्यातील एमपीडीए नुसार करण्यात आलेली ही नववी कारवाई आहे.

कुख्यात गुन्हेगार स्वप्निल उर्फ पन्या गौतम कांबळे, याच्या विरुद्ध जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यामध्ये अत्यंत गंभीर स्वरूपाचे एकूण १३ गुन्ह्यांची नोंद असून त्यामध्ये शस्त्रासह शरीराविरुद्ध, जबरीने मालमत्ता चोरी करण्याचे गुन्हे, मालमत्ता चोरीचे गुन्हे ,भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे, असे एकूण १३ गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत. जनसामान्यात त्याची भीती होती. त्याच्याकडून सार्वजनिक शांततेस धोका असल्याने पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे निर्देशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी,(लातूर शहर) भागवत फुंदे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले, पोलीस ठाणे एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांचे नेतृत्वात एमआयडीसी पोलिस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक संदीप कराड, पोलीस अंमलदार विष्णू वायगावकर, गणेश मालवदे, भीमराव बिल्लाळे, अर्जुन राजपूत, युवराज गिरी,सिद्धेश्वर मदने, संतोष खांडेकर यांनी परिश्रम घेवून प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी यांचे कडे मंजूरी साठी पाठविला होता. व मंजुरी नंतर त्याची अंमलबजावणी केली आहे.

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर वर्षा ठाकूर घुगे यांनी त्याच्या स्थानबद्धतेचा प्रस्ताव मंजूर केला आहे. त्यावरून सदर आरोपीची २६ एप्रिल रोजी नाशिक येथील कारागृहामध्ये रवानगी करण्यात आली आहे.

## काय आहे एमपीडीए कायदा?

**महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ,पायरसी) वाळू तस्कर व अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे गुन्हेगार यांच्या विघातक कृतींना प्रतिबंध करण्याविषयीचा कायदा सन १९८१ (सुधारणा १९९६, २००९ व २०१५) अंतर्गत स्थानबद्धतेचा आदेश म्हणजेच एमपीडीए (महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डेंजरस ॲक्टिविटी) होय. सराईत गुन्हेगार किंवा सातत्याने सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था भंग करणार्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध एमपीडीएची कारवाई करता येते. या कायद्यानुसार सराईत गुन्हेगाराला एक वर्षासाठी कारागृहात स्थानबद्ध करण्यात येते. सतत गुन्हेगारी कृत्य करणारे गुंड प्रवृत्तीच्या विरुद्ध एमपीडीए (महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ डेंजरस ॲक्टिविटी) सारख्या कठोर कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येत असून यानंतरही लातूर जिल्ह्यातील गुंडगिरी व भाईगिरी वृत्तीचा समूळ उच्चाटन करण्यासाठी समाजविघातक प्रवृत्तींना आळा घालण्याकरिता सदरची कार्यवाही करण्यात येणार असून लातूर पोलीस कडून जिल्ह्यातील धोकादायक गुंड व गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद असलेल्या कुख्यात इसमांची माहिती संकलित करण्यात येत आहे.**


**हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंट्र्स, बी-२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले.** **संपादक - शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. :** 9049844412 **आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200**

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE **RNI No. : MAHMAR/2023/86200**

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था आणि कार्यकारी मंडळातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार संपन्न




लातूर – श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर न्यासाच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे श्री. सं. क. कुलकर्णी (धर्मदाय सहआयुक्त, छत्रपती संभाजी नगर) यांच्या नियंत्रणाखाली दि. ०२/०५/२०२४ रोजी संस्थेच्या कार्यालयात संस्थेची निवडणूक संपन्न झाली. यामध्ये आदिनाथ बसवंतराव सांगवे यांची अध्यक्ष, तर माधवराव त्रिबंकराव पाटील (तपसेचिंचोलीकर) यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. त्यांचा आणि कार्यकारी मंडळाच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी शाल, पुष्प गुच्छ, स्मृतीचिन्ह आणि पेढे देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी नवनिर्वाचित संस्था पदाधिकारी राजेश्वर वैजनाथराव बुके, प्रदीपकुमार विश्वनाथप्पा दिंडीगावे, प्रभूप्पा शिवलिंगप्पा पटणे, बसवराज (राजू) गुरुपादप्पा येरटे, महेश वीरभद्रप्पा हालगे, बाबुराव विठ्ठलराव तरगुडे, ॲड. काशिनाथ गुणवंतप्पा साखरे, माधवराव हणमंतराव पाटील (टाकळीकर), सुनील सिद्रामप्पा मिटकरी, विजयकुमार नागनाथप्पा रेवडकर, प्राचार्य डॉ. बाबू खडकभावी, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कार्यालय प्रमुख आणि शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असले पाहिजे. संस्था शैक्षणिक विकास प्रक्रियेमध्ये कुठेही हस्तक्षेप न करता संपूर्ण स्वातंत्र्य आपल्याला देईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ला अनुसरून महाविद्यालयांमध्ये कौटुंबिक सम्यूपदेशन, स्वयंसेवी संस्था व्यवस्थापन, प्रशासनातील कला पदवी, व्यक्तिमत्व विकास आदी विविध नवनवीन अभ्यासक्रमाची आपण गुणवत्तापूर्ण आखणी करून त्याची गुणात्मक आणि परिणामकारक पद्धतीने अंमलबजावणी करावी. यासाठी संस्थेकडून आपल्याला सहकार्य केले जाईल असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी आभारपर मनोगत व्यक्त करताना प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई म्हणाले की, सर्वप्रथम नवनिर्वाचित संस्था व कार्यकारी मंडळातील पदाधिकारी यांचे महाविद्यालय प्रशासनातर्फे मनःपूर्वक हार्दिक स्वागत आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था, महाविद्यालय प्रशासन, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले पाहिजे यासाठी संस्थेचे सातत्याने मार्गदर्शन मिळाल्यास श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा चालणाऱ्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचा शैक्षणिक विकास हा जलद गतीने घडून येईल असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ.राजकुमार लाखादिवे यांनी केले.

## जात निहाय जनगणना आरक्षणापासून वंचित वर्गांना वरदान ठरणार–भाई उदय गवारे



लातूर : गेली २०–२५ वर्षापासून शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे समाजातील मागासलेला, आर्थीक दृष्ट्या दुर्बल वर्ग उच्च शिक्षणापासून वंचीत राहत आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत विचार केला असता मोफत शिक्षणाची संकल्पना मोडीत निघून शिक्षण प्रचंड महागडे झाले आहे. यामुळे समाजातील विविध घटक आरक्षणाची मागणी करत आहेत. आरक्षणाच्या मागणीसाठी देशपातळीवर विविध राज्यात अनेक घटक व वर्ग टोकाचा संघर्ष करत आहेत. प्रचलीत आरक्षणातील वर्गवारी व प्रत्येक घटकाची टक्केवारी याबाबत अनेक वाद व प्रवाद उपस्थित केले जातात.

आमच्या हक्काच्या आरक्षणात इतरांना संधी नको म्हणून जाती–जातीत संघर्ष कशा वाढेल याचा जाणीवपुर्वक प्रयत्न ढोंगी राजकीय पुढारी करत आहेत. जिसकी संख्या जितनी भारी उसकी उतनी हिस्सेदारी या प्रमाणे देश पातळीवर सामाजिक, शैक्षणिक व आर्थीक दृष्ट्या मागासलेल्या वर्गास आरक्षण निश्चित करत असताना देश पातळीवर जात निहाय जनगणना झाल्यास आरक्षणाची मागणी करणाऱ्या विविध वर्गास व घटकांस वरदान ठरणार आहे.

देश पातळीवर लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत, सर्व पक्षातील नेते मंडळी जनतेची नाराजी टाळण्यासाठी आरक्षण आबाधित राहिल अशी वल्गना करत आहेत, परंतू आरक्षणापासून वंचित असलेले विविध वर्ग व घटक यांना आरक्षणाचा लाभ द्यावयाचा असेल तर देश पातळीवर जात निहाय जनगणना झाली पाहिजे, जेणे करून आरक्षणाचा लाभ घेणारे लाभार्थी यांची लोकसंख्या किती तसेच आरक्षणाची मागणी करणाऱ्या गरजवंत वर्गाची व घटकांची लोकसंख्या किती याचा स्पष्टपणे अहवाल जनतेसमोर येईल व गरजवंताना आरक्षणाच्या परिघात त्यांना समाविष्ट करता येईल. जात निहाय जनगणना ही आरक्षणापासून वंचित रहिलेल्या वर्गास व घटकास वरदान ठरणार आहे. म्हणून जात निहाय जनगणनेचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय पक्षांना संधी द्यावी. असे परिपत्रक शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई उदय गवारे यांनी प्रसिध्दीस दिले आहे.

## गंजगोलाईत लोकसभेचे अपक्ष उमेदवार रघुनाथ बनसोडे यांची अनोखी सभा

### सभेला प्रमुख पाहुणे म्हणून सर्व महापुरुष व प्रेक्षक म्हणून खुर्चीवर विटा, दगड



लातूर : लातूर लोकसभेचे अपक्ष उमेदवार रघुनाथ बनसोडे यांनी आज रविवार दि. ५ मे २०२४ रोजी लातूर शहरातील प्रमुख मार्केट असलेल्या मस्जिद रोड, गंजगोलाईत आज दुपारी साडेतीन ते चारच्या दरम्यान एक अनोखी अशी अगळी वेगळीच जाहीर सभा झाली. या जाहीर सभेस अपक्ष उमेदवार रघुनाथ बनसोडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून हजर झालेल्या व्यासपीठावरील खुर्चीतील महापुरुषांना व प्रेक्षक म्हणून खुर्चीवर ठेवलेल्या विटा, दगडे या मूक नागरिकांना या निवडणूक विषयी मार्गदर्शन केले व प्रचाराचा आज ५:३० मिनिटाला शेवट केला असल्याने या अनोख्या सभेला पाहण्यासाठी नागरिकांनी गंजगोलाईत मोठी गर्दी केली होती.



यावेळी लातूर जिल्ह्यातील २५ नंबर ईव्हीएम मशीन वरचे अपक्ष उमेदवार ज्यांचे चिन्ह प्रेशर कुकर असून यांची आज सभा मज्जित रोड गंजगोलाई या ठिकाणी संपन्न झाली या सभेस प्रमुख पाहुणे म्हणून सर्व महापुरुष व या सभेत नागरिक म्हणून विटा, दगड ठेवण्यात आले होते. आज रविवार असल्याने लातूर जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी खूप मोठ्या सभा झाल्या परंतु मस्जिद रोडवरील गंजगोलाई या ठिकाणी अपक्ष उमेदवार रघुनाथ बनसोडे यांचे चिन्ह प्रेशर कुकर घेऊन त्यांची लातूरातील आगळीवेगळीच सभा यात प्रमुख पाहुणे म्हणून सर्व महापुरुष व प्रेक्षक म्हणून दगड, विटाची सभा जी की कोठेतरी रेकॉर्डवर नोंद होण्यासारखी सभा पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी येथे मार्केटमध्ये खरेदी करण्यासाठी आलेले नागरिक आवाज ऐकून या ठिकाणी येत नागरिक मोठ्या संख्येने उभे राहून भाषण ऐकत व पहात होते त्याच बरोबर महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी यांचीही संख्या खूप मोठी होती.

## एसटी डेपो नांदेड आगार येथे महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा



नांदेड– महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. ०१ मे २०२४ बुधवार रोजी सकाळी ठिक ९.१५ वाजता महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६४ वा वर्धापन दिन व १०१ वा जागतिक कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येऊन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. राष्ट्रगीतानंतर लगेचच गुणवंत एच. मिसलवाड यांनी सामूहिकरित्या राज्यगीत घेतले. यावेळी आगार व्यवस्थापक यांनी आपले मनोगत व्यक्त करुन सर्वांना महाराष्ट्र स्थापना दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक अशोकराव चव्हाण, विष्णू हारकळ, वाहतुक निरीक्षक ओमप्रकाश इंगोले, शेख मोबीन, लेखाकार सतीश गुंजकर, वाहतूक नियंत्रक बालाजी शिंदे, कमलकिशोर बियाणी, जयप्रितकौर मदनुरकर, पायल बैस, सुरेश फुलारी, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, पाळीप्रमुख बच्चीतरसिंघ गाडीवाले, लिपीक रेखा माचीनवार, श्वेता तेलेवार, मीना कदम, शिल्पा ढवळे, सुनीता हुंबे, वैशाली कोकणे, एम.पी. तोडे, संतोष देवकांबळे, कृष्णा पवार, संजय मंगनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरेश फुलारी यांनी मांडले. याप्रसंगी कार्यक्रमास आगारातील कामगार कर्मचारी, बंधु भगिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'बिर्ला ओपन माईंडस इंटरनॅशनल स्कूलमध्ये' 'महाराष्ट्र दिन' उत्साहात साजरा



लातूर : लातूर मधील बिर्ला ओपन माईंडस इंटरनॅशनल स्कूल मध्ये १ मे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे सर्वेसर्वा डायरेक्टर श्री.संभाजी सुळ सर होते.तसेच श्री.सचिन सुळ मुख्याध्यापक अनिल पॉल सर उपमुख्याध्यापक अजय शर्मा प्रशासकीय अधिकारी वैजनाथ कदम तसेच सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होते.श्री.संभाजी सुळ सरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर राष्ट्रगीत झाल्यावर शाळेतील संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत सादर करून आलेल्या पाहुण्यांचे व पालकांचे मन जिंकले.सौ.मंजुषा वाडेकर यांनी आपले भाषण केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन सौ.दिपाली कानझाडे यांनी केले.तसेच महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने शाळेमध्ये कला प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.आलेल्या पालकांना ते पाहण्यात यावे म्हणून कला प्रदर्शन आयोजित केले.त्याचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लोकांना किरकोळ समजणाऱ्यांना मतासाठी झोळी पसरावी लागत आहे–ओमराजे निंबाळकर



धाराशिव(प्रतिनिधी): फोनवरुन काम केल्यानंतर ही कामे, जे फोन करतात त्यांच्यासह खासदार देखील किरकोळ म्हणणाऱ्या विरोधक आता त्याच किरकोळ लोकांकडे मताची झोळी पसरताना दिसत आहे. ते किरकोळ आहेत,तर मग आता मतासाठी का त्यांच्या पाया पडत आहात असा सवाल खासदार ओमराजे निंबाळकर यांनी विरोधकांना केला आहे. काटगाव (ता.तुळजापुर) येथे आयोजीत सभेत ओमराजे बोलत होते.

ओमराजे म्हणाले की, सर्वसामान्य लोकांचे सामान्य कामे माझ्याकडुन झाली. हे पाहुन कामे किरकोळ व माणसही किरकोळ असे समजणारी विरोधकाची टोळी आता त्याच सामान्य माणसाच्या मतासाठी मताचा जोगवा मागताना गावोगावी दिसत आहेत. ज्या सामान्य लोकांच्या तुम्ही किरकोळ म्हणुन अपमान केला ती जनता तुम्हाला प्रतिसाद देत नसल्याने तुमच्या पायाखालची वाळु सरकली आहे. फक्त निवडणुकीपुरता विकास करु म्हणणाऱ्या विरोधकांचा खरा चेहरा आता लोकासमोर आलेला आहे. ओमराजे खासदार म्हणुन तुमच्या पाच वर्ष संपर्कात राहिला आहे. फक्त निवडणुकीपुरता मी तुमच्यासमोर आलो असतो तर मला मत मागायचा सुध्दा अधिकार राहिला नसता. हक्काने मी तुम्हाला मतदान मागत आहेत. गावागावातुन लोकांना मताची तर हमी दिलीच आहे पण सोबत पैसा देऊन त्यानी मला प्रेम दिले आहे. स्वकष्टाने कमवुन दिलेला हा पैसा खोका पेटीच्या किंमतीपेक्षा कित्येक पट्टीने अधिक असल्याचे ओमराजे म्हणाले.

निवडणुकपुरता जुगाड करुन कशीही उमेदवारी आपल्या पदरात पाडुन घेणारी ही मंडळी त्यांच्या पक्षाशीही इमान राखत नाही ते जनतेशी कशी इमानदार राहिल असा प्रश्न त्यानी यावेळी उपस्थित केला. आम्ही कसेही वागु आणि जनतेनी आमच्या मागे यावे अशी अत्यंत स्वार्थी भावना ठेवणाऱ्यांना जनता मतदानरुपी शक्ती दाखवुन देतील असा विश्वास ओमराजे यानी व्यक्त केला.